**प्रेसनोट**

जा.क्र. 926 /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :– ९/०३/२०१८

**''बलात्कार करणाऱ्या शिक्षक आरोपीस सात वर्ष सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा''**

भाजी घेण्याचा बहाणा करून शेतावर जावुन ४० वर्षीय महिलेवर बलात्कार करणाऱ्या आरोपी नामे दामोधर देवराम येळेकर, वय ५५ वर्ष, व्यवसाय– नौकरी (शिक्षक), रा. सिंधीपार (मुंडीपार) ता. लाखनी जिल्हा भंडारा यास आज दिनांक ९.०३.२०१८ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा. यांनी आरोपी विरूध्द बलात्कार गुन्हयात दोषसिध्द झाल्याने सात वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक १०.०६.२०१५ रोजी पोलीस ठाणे लाखनी येथे ग्राम सिंधीपार (मुंडीपार) ता. लाखनी येथिल पिडित महिला वय ४० वर्ष यांनी तक्रार दिली की, गावापासुन एक कि.मी..अंतरावर तक्रारदार यांचे शेत असुन त्यामध्ये वांगे, भेंडी, चवळी व लवकी अशा भाजिपाल्यांची लागवड केली होती. दिनांक ९.०६.२०१५ रोजी शेतातील भाजिपाल्यांची तोडणी करणे करीता तक्रारदार, तिचा पती व गावातील मजुर बायांसह सकाळी ७.०० वाजता जावुन चवळी शेंगाची तोडणी केली व तोडलेल्या चवळी शेंगा तक्रारदार पिडित हिचे पती यांनी ९.३० वा. दरम्यान भंडारा येथे विकण्याकरीता मोटार सायकलने घेवुन गेले. त्यानंतर पिडित तक्रादार हि मजुरदार बायांसह शेतात काम करून दुपारी १.०० वा. दरम्यान मजुरदार बायांना सुटी देवुन शेतात असलेल्या घरी एकटीच थांबली, दुपारी २.०० वा. दरम्यान गावातीलच राहणारा दामोधर देवराम येळेकर हा पिडित यांचे शेताकडे मोटार सायकलने येवुन पिडित यांचे शेता लगत असलेल्या नहराचे पाळीवर आपली मोटार सायकल ठेवुन पिडित यांचे शेतातील घराकडे गेला. पिडितेस लवकी पाहिजे अशी विचारणा केले वरून पिडित महिलेने लवकी नाही, चवळी व भेंडी असल्याचे सांगुन शेतावरील घरात

असलेली भेंडी आरोपी यास दाखविण्याकरीता घरात गेली असता आरोपी हा पिडित हिचे मागोमाग जावुन घराचा दार टेकुन पिडित महिलेचे अंगाला कवटाळुन शरीराचे अवांच्छीत ठिकाणी स्पर्श केल्याने पिडित हिने आरोपीस प्रतिकार करून जोरजोरात ओरडली. आरोपी याने पिडितेचे तोंड दाबुन जमिनीवर खाली पाडुन जबरीने संभोग केला व झालेल्या घटणेबाबत माहिती पती किंवा अन्य कोणालाही सांगीतल्यास जिवानिशी ठार करण्याची धमकी देवुन निघुन गेला.

पिडित महिलेचे पती हे भंडारा येथुन परत आल्यानंतर घडलेल्या घटणेची हकीकत पिडितेने पतीस सांगितली व पोलीस ठाणे लाखणी येथे समक्ष येवुन आरोपी नामे दामोधर देवराम येळेकर याचे विरूध्द कार्यवाही करीता तोंडी तक्रार दिली. पोलीस ठाणे लाखनी येथे अपराध क्र. ७७/१५ कलम ३७६, ५०६ भादवि नुसार सहा. पोलीस उपनिरीक्षक ताजिराम उईके यांनी गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक दिपक वानखेडे यांनी करून गुन्हयातील **आरोपी नामे दामोधर देवराम येळेकर, वय ५५ वर्ष, व्यवसाय– नौकरी (शिक्षक), रा. सिंधीपार (मुंडीपार) ता. लाखनी जिल्हा भंडारा** यास अटक करून गुन्हयाचा तपास केला. तपासात आरोपी विरूध्द पुरावे प्राप्त झाल्याने आरोपी विरूध्द आरोप पत्र तयार करून विशेष सत्र न्यायालय, भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ३९/१५ अन्वये न्यायाधिश सा. यांचे समक्ष सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **मा. अतिरिक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा.** यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री विश्वास तवले, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक ९.०३.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी नामे दामोधर देवराम येळेकर, वय ५५ वर्ष, व्यवसाय–शिक्षक, रा. सिंधीपार (मुंडीपार) ता. लाखनी जिल्हा** भंडारा यांचे विरूध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३७६ भादवि अन्वये सात वर्ष सश्रम कारावास व ५०००/– रूपये दंड, दंड न भरल्यास ६ महिणे सश्रम कारावास** अशी शिक्षा सुनावण्यात आली. सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक यशवंत सोलसे, ठाणेदार लाखनी यांचे मार्गदर्शनात पो. हवा. सुनिल टि. राउत/६३६ पो.स्टे. लाखनी यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

महाराष्ट्र पोलीस दल, जिल्हा भंडारा तसेच सरकारी अभियोक्ता वर्ग जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा तर्फे जनतेस निर्भीड पणे गुन्हयाचे दोषसिध्दी करीता व महिलांवरील अत्याचार रोखण्याकरीता पोलीसांना पंच व साक्षदार म्हणुन सहकार्य करण्याचे जाहिर आवाहन करण्यात येत आहे.

( टिप– सदर बातमी सामाजिक दृष्टया महत्वाची असल्याने आपले वर्तमानपत्रात दर्शनी पानावर प्राधान्याने देण्यात यावी.)

(एस.व्ही.कुलकर्णी)
पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी क्र.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**: संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.